## L. A. BILL No. XIX OF 2022.

*A BILL*

FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT AND THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT.

**सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक १९.**

**मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम यांत आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१८८८ चा ३. १९४९ चा ५९. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम यांत आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून, २०२२ चा महा. अध्या. ७. त्यांनी दिनांक ४ ऑगस्ट २०२२ रोजी मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०२२, हा प्रख्यापित केला होता;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या त्र्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक
## **प्रारंभिक.**

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०२२, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ४ ऑगस्ट २०२२ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

## प्रकरण दोन
## **मुंबई महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा.**

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**२.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (अ) मधील, "दोनशे छत्तीस" या मजकुराऐवजी "दोनशे सत्तावीस" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १८८८ चा ३.

## प्रकरण तीन
## **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा.**

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**३.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (अ) मधील तक्त्याऐवजी, पुढील तक्ता दाखल करण्यात येईल :— १९४९ चा ५९.

**" तक्ता**

| लोकसंख्या<br>(१) | पालिका-सदस्यांची संख्या<br>(२) |
|---|---|
| (एक) ३ लाखांपेक्षा अधिक व ६ लाखांपर्यंत. | निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची किमान संख्या ६५ इतकी असेल.<br><br>३ लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक १५,००० इतक्या अधिक लोकसंख्येसाठी एक अतिरिक्त पालिका-सदस्य असेल, तथापि असे की, त्यामुळे निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची कमाल संख्या, ८५ पेक्षा अधिक होणार नाही. |
| (दोन) ६ लाखांपेक्षा अधिक व १२ लाखांपर्यंत. | निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची किमान संख्या ८५ इतकी असेल.<br><br>६ लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक २०,००० इतक्या अधिक लोकसंख्येसाठी एक अतिरिक्त पालिका-सदस्य असेल, तथापि असे की, त्यामुळे निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची कमाल संख्या, ११५ पेक्षा अधिक होणार नाही. |
| (तीन) १२ लाखांपेक्षा अधिक व २४ लाखांपर्यंत. | निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची किमान संख्या ११५ इतकी असेल.<br><br>१२ लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक ४०,००० इतक्या अधिक लोकसंख्येसाठी एक अतिरिक्त पालिका-सदस्य असेल, तथापि असे की, त्यामुळे निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची कमाल संख्या, १५१ पेक्षा अधिक होणार नाही. |

| लोकसंख्या (१) | पालिका-सदस्यांची संख्या (२) |
| --- | --- |
| (चार) २४ लाखांपेक्षा अधिक व ३० लाखांपर्यंत. | निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची किमान संख्या १५१ इतकी असेल.<br>२४ लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक ५०,००० इतक्या अधिक लोकसंख्येसाठी एक अतिरिक्त पालिका-सदस्य असेल, तथापि असे की, निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची कमाल संख्या, १६१ इतकी असेल. |
| (पाच) ३० लाखांपेक्षा अधिक. | निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची किमान संख्या १६१ इतकी असेल.<br>३० लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक १ लाख इतक्या अधिक लोकसंख्येसाठी एक अतिरिक्त पालिका-सदस्य असेल, तथापि असे की, त्यामुळे निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची कमाल संख्या १७५ इतकी असेल.". |

## प्रकरण चार

## **संकीर्ण**

१८८८ चा ३. १९४९ चा ५९. २०२२ चा महा. .

प्रक्रिया रद्द करणे.

**४.** मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात ज्यांचा निर्देश, " उक्त अधिनियम " असा केला आहे) आणि त्याखाली केलेले नियम, काढलेल्या अधिसूचना किंवा काढलेले आदेश यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेथे मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०२२ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी,——

(क) महानगरपालिकांच्या क्षेत्रांची प्रभागांमध्ये विभागणी करण्याची आणि त्यांच्या सीमा विनिर्दिष्ट करण्याची प्रक्रिया, राज्य निवडणूक आयुक्ताने, किंवा यथास्थिति, राज्य शासनाने सुरू केली असेल किंवा पूर्ण केली असेल तेथे, किंवा

(ख) महानगरपालिकांमधील पालिका-सदस्यांच्या जागांच्या आरक्षणाची प्रक्रिया, राज्य निवडणूक आयुक्ताने सुरू केली असेल किंवा पूर्ण केली असेल तेथे,

ती प्रक्रिया, रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि अशी प्रक्रिया, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या उक्त अधिनियमांच्या तरतुदींनुसार नव्याने करण्यात येईल.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**५.** (१) जर या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या, उक्त अधिनियमांच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप उद्भवेल त्याप्रमाणे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्याला आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या, उक्त अधिनियमांच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या कलमान्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

(शा.म.मु.) एचबी ९९३–२ (१४०–८-२०२२)

सन २०२२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ याचे निरसन व व्यावृत्ती.

**६.** (१) मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०२२, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०२२ चा महा. अध्या.७.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या उक्त अधिनियमांच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या उक्त अधिनियमांच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## **महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक १९.]**

**[मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम यांत आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. एकनाथ संभाजी शिंदे,**
मुख्यमंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.